ePaper

## पोटनिवडणूक घेणार की नाही ते सांगा अन्यथा; उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला सुनावले




| वर्ष - 7 । अंक - 210 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । शुक्रवार, दिनांक 8 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


आतील पानांत


- श्रीसंत गंभीर यांच्यात वाद
- आता खुर्ची आपलीच हाय'!
- सावरकर वीर नव्हते : प्रियांक खरगे
- हल्ला फक्त मलिक यांच्यावर


# आंधळा कारभार...वाऱ्यावर जनता!

## » पुनावळे कचरा डेपो प्रश्न : भूमिपुत्र, सोसायटीधारकांवर उपोषणाची वेळ

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपो ही शहराची गरज आहे, असा दावा करणारे महापालिका प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांची भूमिका म्हणजे “आंधळा कारभार.. अन् वाऱ्यावर जनता..” असा प्रकार आहे. कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्यासाठी सर्वस्तरातून विरोध होत असतानाही डेपो विकसित करण्यासाठी गुप्त बैठका करणाऱ्या प्रशासनाविरोधात भूमिपूत्र आणि सोसायटीधारकांवर उपोषण करण्याची वेळ आली आहे.**






पुनावळेतील प्रस्तावित कचरा डेपोचे आरक्षण रद्द करण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरद पवार गट) शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी महापालिका भवनासमोर गुरूवारपासून सात दिवस साखळी उपोषण सुरू केले आहे. याला स्थानिक ग्रामस्थ अतूल काटे आणि सहकाऱ्यांनी पाठिंबा दिला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापनेपासून मोशी येथील कचरा डेपोवर कचरा डंम्पिंग केले जात होते. त्या ठिकाणी वेस्ट टू एजर्नी सारखा प्रकल्प उभारला असून, त्याद्वारे प्रतिदिन १५०० हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते, असा प्रशासनाचा दावा आहे. याउलट, पिंपरी-चिंचवडमध्ये प्रतिदिन १३०० टन कचरा संकलित होतो, असे सांगितले जाते. तसेच, बायोमायनिंग, सी एन्ड डी वेस्ट प्रकल्पही सुरू आहेत. मग, कचऱ्याचे डोंगर कमी केल्याचा दावा करत असताना प्रशासनाला नव्या कचऱ्या डेपोची आवश्यकता काय? असा प्रश्न आहे. शहराची आंतरराष्ट्रीय ओळख पुसण्याचा प्रयत्न...

पिंपरी-चिंचवड हे वेगाने विकसित होणारे शहर आहे. या शहराच्या विकासाचा पाया माजी केंद्रीय मंत्री तथा राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी घातला. ज्या भागात त्यांच्या दूरदृष्टीने ‘हिंजवडी आयटी पार्क’ विकसित झाला. ज्यामुळे पिंपरी-चिंचवडला आंतरराष्ट्रीय ओळख प्राप्त झाली. त्याच भागात पुनावळे येथे कचरा डेपो उभारण्याच्या हालचाली सुरू आहेत. पुनावळे गावचा पिंपरी-चिंचवडच्या हद्दीत १९९७ मध्ये समावेश झाला. त्यानंतर २००८ साली या ठिकाणी प्रशासनाने कचरा डेपोचे आरक्षण टाकले होते. हा भाग वन विभागाच्या हद्दीत येतो. गेल्या १५ वर्षांत प्रशासनाला या ठिकाणी कचरा डेपो केला नाही. आता या भागात पुनावळे, हिंजवडी, मारुंजी आणि जांबे अशा गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती झाली आहे. प्रस्तावित डेपोच्या परिसरातच सुमारे २० हजार लोकवस्ती आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून या ठिकाणी नागरिक वास्तव्यास आले आहेत. शहराची आंतरराष्ट्रीय ओळख आयटी पार्क मुळे झाली. त्याच परिसरात कचरा डेपो विकसित करुन महापालिका प्रशासन काय हासिल करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### हरित क्षेत्र नष्ट करण्याचा अधिकार प्रशासनाला आहे का?

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. नागरीकरण आणि प्रदूषणाचा प्रश्न गंभीर होत असताना उपलब्ध असलेले हरित क्षेत्र नष्ट करण्याचा घाट घातला जात आहे. प्रस्तावित कचरा डेपोची जागा वनविभागाची असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्ष आहेत. वनविभागाची जागा पिंपरी-चिंचवडमध्ये घेतली जात आहे. त्या बदल्यात वन विभागाला गडचिरोली येथील जागा विकत घेवून देण्याची तयारी पिंपरी-चिंचवड महापालिका करीत आहे. ही बाब अत्यंत चुकीची आणि आक्षेपार्ह आहे. शहराचा ऑक्सीजन पार्क असलेली हरित क्षेत्र नष्ट करण्याचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला? असा प्रश्न आहे.



### पिंपरी-चिंचवडकरांचे आरोग्य धोक्यात...

» प्रस्तावित कचरा डेपोच्या जवळच पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारा रावेत बंधारा आहे. कचरा डेपोच्या ‘लिचेड’मुळे हा जलस्त्रोत प्रदूषित होण्याची भीती आहे. त्यामुळे नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो. कचरा डेपोच्या चर्चेमुळे भूमिपुत्रांना कवडीमोल दराने जमीनी विकाव्या लागल्या. त्या भागात आता मोठे गृहप्रकल्प उभारण्यात आले आहेत. यामध्ये हजारो सदनिकाधारकांनी वास्तव्यास सुरूवात केली आहे. त्या नागरिकांना वेठीस धरण्याचे काम पिंपरी-चिंचवड महापालिका करीत आहे.

“ कचरा डेपो आरक्षण रद्द करावे म्हणून गत महिन्यामध्ये सोसायटीधार, स्थानिक नागरिकांनी सुमारे ७ हजार आंदोलकांची बाईक रॅली काढली. एव्हढ्या मोठ्या प्रमाणात विरोध असताना प्रशासन हा प्रकल्प जबरदस्ती लोकांच्या माथी मारण्याचा प्रयत्न करीत आहे. गडचिरोलीमध्ये वन विभागाला जागा देण्यात येत आहे. त्याठिकाणी वृक्षलागवड केली जाणार आहे. त्या बदल्यात पुनावळेतील वृक्षतोड करण्याचा दावा केला जातो. मग, गडचिरोलीच्या वृक्ष लागवडीचा पिंपरी-चिंचवडकरांना काय फायदा? असा आमचा प्रश्न आहे. नागरी आरोग्याला धोका निर्माण करणारा, जलस्त्रोत दूषित करणारा, शहराच्या पर्यावरणासाठी घातक असणारा आणि आयटी हबला दुर्गंधीने बदनाम करणारा हा प्रकल्प तात्काळ रद्द करावा.

**-तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी. (शरद पवार गट).**

# चाकणकरांनी आम्हाला फसवले!

## संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक प्रदीप कानसेंचा दावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी खोट्या आरोपांमध्ये आम्हाला फसवले आहे. आम्ही कुठल्याही अश्लील टिप्पण्या केल्या नव्हत्या" असं संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक प्रदीप कानसे यांनी सांगितलं.**

रुपाली चाकणकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केल्याबद्दल प्रदीप कानसे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्याबाबत प्रदीप कानसे हे आपली भूमिका मांडत आहेत. त्यांनी एबीपी माझाशी बोलताना रुपाली चाकणकर यांचे आरोप फेटाळून लावले. आम्ही स्त्रियांचा आदर करतो, जय जिजाऊ म्हणत आम्ही बोलायला सुरुवात करतो. आमचा आक्षेप रुपाली चाकणकर यांनी केलेल्या पोस्टवर होता. वामन बळीराजाच्या डोक्यावर पाय ठेवतो अशी पोस्ट त्यांनी दिवाळी मध्ये केली होती. त्यावर आमचा आक्षेप आहे, त्यांनी मला अडकवले आहे. माझी बदनामी केली आहे. रुपाली चाकणकर पदाचा फायदा घेतात, लोकांवर दबाव टाकतात, अन्याय करतात", असा आरोप प्रदीप कानसे यांनी केला. रूपाली चाकणकर यांनी दिवाळीत बळी राजाच्या डोक्यावर पाय ठेवणाऱ्या वामनाचे चित्र पोस्ट केले होते. हे संकल्प चित्र बळीराजाबद्दलच्या ऐतिहासिक तथ्यांवर अन्याय करणारे असल्याचा दावा प्रदीप कानसे यांनी केला होता. मात्र पुणे सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. रुपाली चाकणकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. मात्र आपण रुपाली चाकणकर यांच्याबद्दल कोणतेही आक्षेपार्ह लिखाण केले नाही असा दावा प्रदीप कणसे यांनी केला. रुपाली चाकणकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर अश्लील मजकूर प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तींचा आणि आपला कोणताही संबंध नसल्याचेही प्रदीप कणसे यांनी म्हटलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नेत्या आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविषयी समाजमाध्यमात अश्लील मजकूर प्रसारित केल्याप्रकरणी पुणे सायबर पोलीसांनी गुन्हा दाखल करून चौघांना ताब्यात घेतलं.



रुपाली चाकणकर यांच्या बाबतीतील अश्लील पोस्ट विकास सावंत, जयंत पाटील, रणजीतराजे हात्तींबरे, अमोल के. पाटील यांनी फेसबुकवर शेअर केली होती. या चौघांवर पुणे सायबर पोलीस ठाण्यात आयपीसी 354 (अ) आणि 509 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुपाली चाकणकर यांचे भाऊ संतोष बबन बोराटे यांनी पुणे सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यातील संशयित असलेल्या जयंत पाटील, रणजीतराजे हात्तींबरे आणि अमोल पाटील यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून, त्यांचे मोबाईल क्रमांक सायबर पोलिसांनी मिळवले.

आधारे पोलीस पोलिसांनी जयंत रामचंद्र पाटील या सांगली जिल्ह्यातील धनगरवाडीत राहणाऱ्या आरोपीपर्यंत पोहोचले . त्याला ताब्यात घेतले असता तपासादरम्यान तो मानसिक रुग्ण असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस देऊन त्याचा जबाब नोंदवून मोबाईल जप्त केला. तसेच सोशल मीडिया पोस्टवर अश्लील भाषेत कमेंट केलेल्या फेसबुक युजर नावाचे अकाऊंट असलेल्या संशयित व्यक्तीची फेसबुक कंपनीकडून तांत्रिक माहिती घेण्यात आली. पोलिसांनी वसंत रमेशराव खुळे वय-34 रा. रहाटी, ता.जि. परभणी याचा शोध घेतला असता, आरोप रहाटी येथे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने रहाटी येथे जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्याला सायबर पोलीस ठाण्यात आणून त्याचा जबाब नोंदवून घेत फोन जप्त केला. त्याला सी.आर. पी.सी प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे.आम्ही स्त्रियांचा आदर करतो, जय जिजाऊ म्हणत आम्ही बोलायला सुरुवात करतो. आमचा आक्षेप रुपाली चाकणकर यांनी केलेल्या पोस्टवर होता. वामन बळीराजाच्या डोक्यावर पाय ठेवतो अशी पोस्ट त्यांनी दिवाळी मध्ये केली होती.

### सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस

» याशिवाय फेसबुक युजर प्रदीप कणसे नावाने पोस्टवर अश्लील भाषेत कमेंट करण्यात आली होती. पोलिसांनी हे फेसबुक अकाऊंट वापरणाऱ्या संशयिताचा मोबाईल क्रमांक प्राप्त करुन त्याला देखील सी.आर.पी.सी प्रमाणे नोटीस दिली. या चौघांवर पुणे सायबर पोलीस ठाण्यात आयपीसी 354 (अ) आणि 509 नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत रुपाली चाकणकर यांचे भाऊ संतोष बबन बोराटे यांनी पुणे सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. यातील संशयित असलेल्या जयंत पाटील, रणजीत राजे हात्तींबरे आणि अमोल पाटील यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून, त्यांचे मोबाईल क्रमांक सायबर पोलिसांनी मिळवले.

# आमदार धंगेकर डॉक्टरांच्या वेशभूषेत

## ललित पाटील प्रकरणात चौकशीची मागणी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आजपासून हिवाळी अधिवेशनाला सुरवात होत असून, पुण्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर (RAVINDRA DHANGEKAR) हे स्टेथोस्कोप आणि एप्रन घालून डॉक्टरांच्या वेशभूषेत विधानभवनात पोहचले आहेत. ललित पाटील प्रकरणात (LALIT PATIL DRUG CASE) सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यासाठी त्यांनी डॉक्टरांच्या वेशभूषेत विधानभवन गाठत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.**





तर, ललित पाटील यांना पंचतारांकित सेवा रोहित पाटील यांना दिली होती, संजीव ठाकूर (Sanjeev Thakur) यांना अटक करावी यासाठी रस्त्यावर आम्ही आलो असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय संजीव ठाकूर यांना ज्यांनी-ज्यांनी फोन केले, कोण कोण यामध्ये होते त्या सगळ्यांची चौकशी व्हावी या मागणीचं लक्ष वेधण्यासाठी मी आज अधिवेशनात अशाप्रकारे आलो असल्याचं धंगेकर पुढे बोलतांना म्हणाले की, ललित पाटील ससून रुग्णालयातून पळून गेला. ससून रुग्णालयाच्या 'डीन'ने तब्बल नऊ महिने ललित पाटील याला पंचकारित सेवा दिली होती. यासाठी सातत्याने आम्ही आवाज उठवत आहोत. याप्रकरणी आतापर्यंत अनेक लोकांना अटक देखील झाली आहे. मात्र संजीव ठाकूर यांना आत्तापर्यंत अटक झालेली नाही. या मागणीसाठी आम्ही सातत्याने रस्त्यावर उतरलो. आज अधिवेशनाचा पहिला दिवस आहे. या प्रकरणात सरकारचं लक्ष गेलं पाहिजे आणि संजीव ठाकूर यांना ज्याज्या मंत्र्यांनी फोन केले त्यांची देखील चौकशी झाली पाहिजे, असे धंगेकर म्हणाले. तर, अनेकांची चौकशी सुरू आहे. आत्तापर्यंत 30 पेक्षा अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे. पण संजीव ठाकूर यांना देखील अटक केली पाहिजे. तसेच त्यांना ज्यांनी-ज्यांनी फोन केले आणि ललित पाटील याला ससून रुग्णालयात ठेवण्यासाठी मदत केली त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. तुरुंगात असताना डॉक्टरांना ज्यांनी फोन केले, तसेच ललित पाटीलला अटक केल्यानंतर पोलिसांना ज्यांनी फोन केले त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे.

# संजीव ठाकूरांच्या मुलाचाही राजीनामा!

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

ललित पाटील (Lalit Patil) प्रकरणात पदमुक्त करण्यात आलेले ससूनचे माजी डीन संजीव ठाकूर (Sanjeev Thakur) यांच्या मुलाने राजीनामा दिला आहे. डॉ. अमेय ठाकूर (Dr. Amey Thakur) असे मुलाचे नाव असून ते बी जे मेडिकल कॉलेजमध्ये (B J Medical College) प्राध्यपक म्हणूक कार्यरत होते. त्यांनी बी जे मेडिकल कॉलेजमधील प्राध्यापक पदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्याचे कारण समोर न आल्याने अनेक चर्चांना उधाण आले आहे. डॉक्टर संजीव ठाकूर पुण्यात ससून रुग्णालयाचे डीन म्हणून रुजू झाल्यानंतर डॉक्टर अमेय ठाकूर हे बी जे वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते. त्याआधी डॉक्टर संजीव ठाकूर सोलापूरला शासकीय रुग्णालयात डीन म्हणून असताना डॉक्टर अमेय ठाकूर तिथल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करत होते. ज्याला सोलापुरातील काही डॉक्टरांनी आक्षेप घेतला होता. डॉक्टर अमेय ठाकूर यांची वैद्यकीय महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती त्यांचे वडील डॉक्टर संजीव ठाकूर यांच्या प्रभावातून झाल्याचा आरोप होत होता. अखेर त्यांनी राजीनामा दिला आहे. ससून रुग्णालयात अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर आणि मुलगा डा. अमेय ठाकूर या पितापुत्रांसाठी रुग्णालयात विशेष सेवा असल्याच्या चर्चा समोर आल्या होत्या.

# विकासकामांसाठी गरज कालबद्ध नियोजनाची!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांची सूचना : आयुक्तांसोबत विकासकामांची पाहणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना पायाभूत सोयी-सुविधा देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा. ज्याद्वारे विकासकामांना गती देता येईल. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सकारात्मक भूमिकेतून प्रकल्प मार्गी लावावेत, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी नवी सांगवी परिसरातील विविध प्रस्तावित विकासकामांची पहाणी केली. पहाणी दौऱ्यामध्ये सांगवी, नवी सांगवी, पिंपळे गुरव आदी ठिकाणच्या विकासकामांचा आढावा घेतला. यावेळी माजी महापौर माई ढोरे, माजी स्थायी समिती सभापती राजेंद्र राजापूरे, माजी नगरसेवक सागर अंगोळकर, हर्षल ढोरे, उषा मुंडे, अंबरनाथ कांबळे, संतोष कांबळे, शारदा सोनावणे, श्री गणेश सहकारी बँकेचे संचालक संजय जगताप, माजी सिनेट सदस्य संतोष ढोरे, भाजपा शहर चिटणीस हिरेन सोनावणे, सामाजिक कार्यकर्ते जवाहर ढोरे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.



> शहराचे वाढते नागरीकरण आणि वाहतूक समस्या याचा विचार करुन महापालिका प्रशासनाने प्रस्तावित रस्ते आणि नदी पात्रावरील पुलांची कामे तातडीने हाती घेतली पाहिजेत. तसेच, मुख्य रस्त्यांना पर्यायी रस्ते उपलब्ध करण्याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. या दृष्टीकोनातून प्रशासकीय प्रमुख शेखर सिंह यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली. आगामी काळात निश्चितपणे प्रस्तावित कामांना गती दिली जाईल.
>
> **- शंकर जगताप, शहराध्यक्ष,** भाजपा, पिंपरी-चिंचवड.

यावेळी सांगवी येथील संगमनगर, ममतानगरमार्गे बोपोडी, औंधकडे जाणाऱ्या पुलाच्या संदर्भात चर्चा झाली. या पुलाच्या बाबतीत कृषी विभागाच्या काही तांत्रिक अडचणी असून, त्या लवकरच मार्गी लावण्यात येतील. तसेच, मधुबन सोसायटी गल्ली नंबर १ ते ९ येथील १२ मीटरचा रस्ता, नवी सांगवी येथील कृष्णा चौक येथे २० मीटरच्या रस्त्यासंदर्भात तसेच रामनगर-यमुना सोसायटी, मयूर नगरीच्या शेजारचा रस्त्याच्या कामाला गती देण्याबाबतही चर्चा करण्यात आली. शंकर जगताप म्हणाले की, नागरिकांना पायाभूत सुविधा सक्षमपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून आम्ही पाठपुरावा करीत आहोत. यामुळे शहरातील नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा या दर्जेदार असाव्यात, यासाठी आम्ही नेहमीच आग्रही आहोत. किमान पुढील ५० वर्षांचा विचार करून प्रशासनाने मुलभूत सुविधांची निर्मिती करावी, अशी अपेक्षा आहे.

# 'स्पोर्ट्स सीटी'त खेळाडू 'वंचित'

## दत्तक योजनेचा महापालिकेला पडला विसर? : राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा सवाल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने महापालिकेची खेळाडू दत्तक योजना सुरू करण्यासाठी आज अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना निवेदन देण्यात आले. 'स्पोर्ट्स सीटी' घडवण्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असताना दत्तक योजनेपासून खेळाडूच 'वंचित' असल्याने क्रीडा क्षेत्रातून नाराजीचा सूर आहे.**



यावेळी बोलताना युवक अध्यक्ष इम्रान शेख म्हणाले की, "पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील उदयोन्मुख आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या खेळाडूंकरिता पिंपरी चिंचवड मनपा तर्फे गेली अनेक वर्ष खेळाडू दत्तक योजना सुरू होती. या योजनेतून विविध प्रकारच्या क्रीडा प्रकारातील खेळाडूंना महापालिकेकडून आर्थिक हातभार लावला जात होता. या योजनेत खेळाडूंसाठी फिजिओथेरपी मानसोपचार आणि क्रीडा वैद्यक या सुविधा पुरविण्यात येत होत्या. यात पीएमपीएल बस मोफत पास, खेळाडूंना कीट आणि आहार भत्ता, तसेच नियमानुसार शिष्यवृत्ती तसेच आहार भत्ता देण्यात येत होता. हॉकी कबड्डी बॅडमिंटन रायफल शूटिंग जलतरण लॉन टेनिस बॉक्सिंग या खेळांसाठी ही योजना होती.परंतु कोविड-19 च्या प्रभावानंतर सदर योजना बंद करण्यात आली. दोन वर्ष उलटून गेले तरी ही योजना पुन्हा सुरू करण्यात आली नाही. युवक शहराध्यक्ष इम्रान शेख, युवक कार्यअध्यक्ष सागर तापकीर,युवा नेते ऍड संतोष शिंदे.युवक पदाधिकारी शाकीब शेख,वृशांत सोनवणे उपस्थित होते.

### ... अन्यथा जनआंदोलन

»शहरात आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय पातळीवर गोल्ड मेडल मिळवणारी खेळाडूंची संख्या लक्षणीय आहे. शहरातील उद्योन्मुख व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या खेळाडूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.तरी शहराचे व राज्याचे तसेच देशाचे नाव उज्वल करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या खेळाडूंकरिता माननीय आयुक्त साहेबांनी सदर योजना पुनर्जीवित करावी व शहरातील गोरगरीब खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे.अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने केली गेली.मागणी मान्य न केल्यास महापालिका प्रशासनाविरुद्ध जन आंदोलन उभे करावे लागेल असा इशारा इम्रान शेख यांनी दिला."

### खेळाडुंपर्यंत आर्थिक मदत


»यावेळी बोलताना कार्याध्यक्ष सागर तापकीर म्हणाले " ऋतुराज गायकवाड सारखा पिंपरी चिंचवड मधील एक खेळाडू आज देशाचा प्रतिनिधित्व करत आहे. पिंपरी चिंचवड शहरातून देशाचं नावलौकिक करणारे मोठ्या संख्येने खेळाडू असून त्यांना आर्थिक मदत पोहोचली पाहिजे." यावेळी ऍड संतोष शिंदे म्हणाले "खेळाडू दत्तक योजनेत काही निवडक खेळांना स्थान न देता ऑलिंपिक मध्ये येणाऱ्या तसेच क्रिकेट, कराटे,किक बॉक्सिंग सारख्या सर्व प्रकारच्या क्रीडा स्पर्धेतील खेळाडूंना सदर योजनेत स्थान मिळावे.




# ॲनिमल' सारखाच सिनेमा असू शकतो

**रणबीर कपूरची प्रमुख भूमिका असलेला, संदीप रेड्डी वांगा यांनी दिग्दर्शित केलेला 'ॲनिमल' हा सिनेमा सध्या सगळीकडेच चर्चेत आहे. संदीप रेड्डी वांगा यांचा अर्जुन रेड्डी आणि त्याचा हिंदी अवतार असलेला कबीर सिंग होता, तसाच किंवा त्याहूनही आणखी दोन पावलं पुढे जात हा सिनेमा पुरुषांमधल्या हिंसेची, तसंच 'अल्फा मेल'ची रुपं दाखवतो आणि ते सगळं भयंकर आहे, असं एक मत आहे.**

आत्यंतिक पुरुषी असलेली




'ॲनिमल' मधली रणविजय ही व्यक्तिरेखा अत्यंत मिसोजेनिस्ट म्हणजे स्त्रीद्वेष्टी आहे, असं एक मत आहे. तर 'ॲनिमल' हे नाव असलेल्या सिनेमाकडून सरळ-साध्या गोष्टीची अपेक्षा करणंच चुकीचं असं कुणाला वाटतं तर कुणाला या सिनेमातल्या नायकाच्या 'अल्फा मेल' स्वरुपाबाबत सिनेमा पाहताना स्त्रिया ज्या पद्धतीने टाळ्या वाजवत प्रतिसाद देतात, ते चिंताजनक वाटतं आहे. एकुणात काय तर बऱ्याच दिवसांनी एखाद्या सिनेमाबद्दल एवढी उलटसुलट चर्चा होते आहे. तसं एखादा नवीन सिनेमा आला, चाहत्यांना आवडला किंवा त्यात काहीतरी लक्ष वेधून घेणारं असलं की त्याची चर्चा होतेच. उदाहरणार्थ शाहरुख खानच्या जवान सिनेमाबद्दलही भरपूर चर्चा झाली, पण तिचे संदर्भ वेगळे होते. 'ॲनिमल'चे संदर्भ पूर्ण वेगळे आहेत. असा सिनेमा स्त्रियांबद्दलचा सगळा पुरोगामी विचार मागे नेऊन ठेवतो, म्हणून तो आक्षेपार्ह आहे, असं काहींचं म्हणणं आहे, तर असं एवढ्या टोकाला जाऊन चर्चा करण्यासारखं त्या सिनेमात काहीही नाही, उगाच चिंता करू नका असाही एक प्रवाह आहे. गंमत म्हणजे सिनेमा बघितलेला नाही, असे लोकही या चर्चेत आपलं मत पुढे करताना दिसत आहेत. तर या सिनेमात दाखवलेल्या पुरूषी आक्रमकता किंवा अल्फा मेल या वृत्तीबद्दल आणि तिला प्रतिसाद का मिळतो आहे, याची चर्चा. मुळात 'ॲनिमल' सिनेमात असं काही आहे याची हे काहीतरी वेगळं. नवं आहे, चिंताजनक आहे अशा पद्धतीने चर्चा करण्याचीच गरज नाही कारण आपण, आपला समाज असेच आहोत. ज्या सिनेमाच्या माध्यमातून हे सगळं दाखवलं जातं, तो मुळात तयार होतो तोच पुरुषांसाठी. पुरूष प्रेक्षक हेच आपल्या सिनेमाचे खरे ग्राहक असतात. त्यामुळे त्यांना रिझवण्यासाठी, त्यांना आपले पैसे वसूल झाले आहेत, असं वाटावं याच पद्धतीने सिनेमा तयार केला जातो. अगदी मोजके अपवाद वगळले तर सिनेमा कशा पद्धतीने पेश केला जातो, त्यात स्त्रियांना ज्या पद्धतीने दाखवलं जातं, ते लक्षात घेतलं की सिनेमा कसा पुरुषांसाठीचं तयार केला जातो, हे लक्षात येतं. स्त्री पुरुषांचं प्रेम ही अनेकदा सिनेमांची मुख्य संकल्पना असते. त्यातील तथाकथित नायक त्याला आवडलेली नायिका मिळवण्यासाठी सगळ्या खटपटी करतो. प्रसंगी खलनायक आणि त्याच्या सहकाऱ्यांची दोन हात करतो. वेळप्रसंगी समाजाशी संघर्ष करतो. त्याने त्याच्या सामर्थ्याचं प्रदर्शन करायचं आणि त्याला आवडलेली स्त्री मिळवायची हेच आपला सिनेमा आधीपासूनच दाखवत आलेला नाही का? मग हे अल्फा मेलपेक्षा वेगळं काय आहे ? आपल्यासाठी असं सगळं करणाऱ्या तथाकथित सामर्थ्यवान पुरुषाला हवं ते करायला आपण तयार आहोत, किंवा आपल्याला असाच पुरुष मिळायला हवा असंच स्त्रियांना वाटावं अशीच त्यांचीही मानसिकता तयार करून दिली जात नाही का? एखाद्या स्त्रीला एखादा पुरुष मिळवायचा आहे आणि त्यासाठी ती आपलं सगळं सामर्थ्य वापरते आहे असं किती सिनेमे दाखवतात? उलट तिने निर्बुद्धपणे आपल्या सौंदर्याचा वापर करायचा आणि पुरुषाने त्याच्या सामर्थ्याचा हेच मिथक आपला सिनेमा कायमच ठसवत आला आहे. त्यामुळे अल्फा मेल ही संकल्पना खरंतर आपल्या सिनेमात वेगवेगळ्या पद्धतीने कायमच मांडली गेली आहे. पुरुष हा मुळात टोळीत वावरणाऱ्या प्रमुख नरासारखाच असतो, तो त्याला हवं ते आधी सामोपचाराने मिळवायचा प्रयत्न करतो आणि ते तसं मिळालं नाही तर आक्रमकपणे मिळवतो, हिसकावून घेतो. आणि आपल्याला मिळवण्यासाठी कुणीतरी सामर्थ्याचं प्रदर्शन करतं, आपल्या कुटुंबासाठी कुठल्याही थराला जातं ही गोष्ट स्त्रियांना आवडते, हेच सिनेमांनी आपल्याला शिकवलं आहे. एकदा ही मानसिकता तयार असल्यावर थोड्याफार फरकाने त्यात बसेल अशीच कथानकं तयार होणार यात आश्चर्य ते काय?

## संपादकीय »

# दांडगेश्वरांचा काळ!

***संस्कृतीच्या प्रत्येक टप्प्यावर एक काळ असा येतो की ज्या वेळी सज्जनांच्या सुसभ्य वर्तनापेक्षा रासवटांच्या असभ्य वर्तनात 'पौरुष' (?) असल्याचे मानले जाते.***

संस्कृतीच्या प्रत्येक टप्प्यावर एक काळ असा येतो की ज्या वेळी सज्जनांच्या सुसभ्य वर्तनापेक्षा रासवटांच्या असभ्य वर्तनात 'पौरुष' (?) असल्याचे मानले जाते. सभ्यतेस 'नामर्द' (?) गणले जाते आणि नियमाने चालणाऱ्याची वासलात 'नेभळट' अशी लावली जाते. हा काळ असा की दांडगटांची दमनशाही लोकांस अधिक भावते. म्हणजे वाहतुकीची वर्दळ असलेल्या कोणत्याही चौकात सभ्य-सदाचारी वाहतूक सिग्नल हिरवा होण्याच्या प्रतीक्षेत असतो आणि बेमुर्वतखोर मोटारचालक नियम-बियम खुंटीस टांगून सर्रास आपल्या मोटारी दामटतात. हे सर्वकालीन सत्य असले तरी बहुतांश समाजास जेव्हा या अशा नियमभंजकांचे कौतुक वाटू लागते, त्यांच्या कर्तबगारीचे अप्रूप वाटू लागते आणि या असल्या व्यक्ती अनुकरणीय वाटू लागतात तेव्हा निश्चितच ती संस्कृतीच्या ऱ्हासाची सुरुवात असते. जागतिक पातळीवर अशी दोन उदाहरणे आढळतात.

**मोदी सरकारने गेल्या सुमारे १० वर्षांत एकूण आर्थिक विकासासाठी बरेच काही केले. परंतु कृषि विकासासाठी फारसे काही केल्याचे दिसत नाही. प्रत्येक शेताला पाण्याची सुविधा, 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' अशी घोषणाबाजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले. परंतु प्रत्यक्षात यातील काहीच घडलेले दिसत नाही. शेती क्षेत्राचा विकास न झाल्यामुळे धान्योत्पादनात पुरेशी वाढ झाली नाही.**

# गावांनी आखली आहे, कृषिविकासाची पाऊलवाट

देशात कडधान्यांचे पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे आपल्याला ती आयात करावी लागतात. खाद्यतेल हा विषय डोकेदुखी वाढविणारा आहे. कडधान्ये व खाद्यतेल यांच्या आयातीसाठी आपल्याला वर्षाला सुमारे दोन लाख कोटी रुपयांचे परकीय चलन खर्च करावे लागते. अशी कृषी उत्पादने देशात पुरेशा प्रमाणात उत्पादित होऊ लागली, तर परकीय चलन तर वाचलेच आणि त्याचबरोबर शेतकऱ्यांचे उत्पन्नही तेवढ्या प्रमाणात वाढेल. भारतात सुमारे अडीच कोटी हेक्टर सुपीक जमीन पडीक आहे. अशी जमीन लागवडीखाली येण्यासाठी केंद्र सरकारने आणि राज्य सरकारांनी कोणती पाऊले उचलावीत हे नीति आयोगाने २०१६ साली सरकारला सांगितले.

सरकारने नीति आयोगाच्या शिफारशीनुसार कृती केली असती, तर ग्रामीण भारतात सुमारे अडीच कोटी लोकांना उत्पादक रोजगार उपलब्ध झाले असते आणि त्यानंतर



सरकारला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेवर वर्षाला सुमारे एक लाख कोटी रुपये खर्च करावे लागले नसते. तसेच आज पडीक असणाऱ्या जमिनीवर कडधान्ये व तेलबिया यांचे प्राधान्याने उत्पादन घेऊन देश भुसार पिकांच्या संदर्भात स्वयंपूर्ण झाला असता. परंतु प्रत्यक्षात असे घडले नाही. २०२१ साली भारतात नॅनो रासायनिक खतांचे उत्पादन सुरू करण्यात आले. अशी खते बनविण्याचे तंत्रज्ञान भारताने विकसित केले आहे आणि त्यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन करण्याचे एकस्व अधिकार म्हणजेच पेटन्ट मिळविले आहे. अशा नॅनो खतांचा उत्पादन खर्च पारंपारिक रासायनिक खतांपेक्षा खूप कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खतांवरील खर्चात मोठी बचत होईल. या खतांच्या वापरामुळे उत्पादनात सुमारे १० टक्के वाढ होणार आहे. तसेच अशी खते वनस्पती तात्काळ शोषून घेत असल्यामुळे पारंपारिक रासायनिक खतांमुळे होणारी पर्यावरणाची हानी निकाली निघणार आहे. एवढे सर्व फायदे होण्याची खात्री असताना नॅनो रासायनिक खतांचे पुरेशा प्रमाणात उत्पादन सुरू झालेले दिसत नाही. काही देशांनी नॅनो खतांची मागणी केली. परंतु सरकारने त्यांना प्रतिसाद दिला नाही. हा दुधाळ गाईच्या कासेतील दूध न काढण्यासारखा प्रकार झाला! नॅनो रासायनिक खतांचे पुरेशा प्रमाणात उत्पादन झाले असते, तर सरकारचे रासायनिक खतांसाठी अनुदान देण्यासाठी वर्षाला खर्च होणारे २.२५ लाख कोटी रुपये वाचले असते. नॅनो रासायनिक खतांच्या संदर्भातील माहिती जाहीर होताच काही देशांनी अशी खते विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पीक विम्याची 53 रुपये रक्कम घेण्यासाठी बैलगाडीतून आणली तिजोरी

## » शेतक-यांचा आंदोलनाने यवतमाळकरांचे लक्ष वेधले

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अतिवृष्टीमुळे यावर्षी खरीप हंगामात कापूस, तुर, सोयाबिन उत्पादक शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले. असे असतांना पिक विमा कंपण्यांनी मात्र शेतक-यांना पस्तीस, पन्नास अनं नव्वद रुपये नुकसान भरपाई देऊन त्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. याकडे सरकार सुध्दा दुर्लक्ष करीत असल्यामुळे शेतक-यांमध्ये असंतोष आहे.**

या असंतोषाचा राग शेतक-यांनी अनोखे आंदोलन करुन व्यक्त केला. थेट तिजोरीसह शेतकरी पोलिस अधिक्षक कार्यालयावर धडकले आणि त्यांनी विम्याच्या रकमेसाठी सशस्त्र संरक्षण देण्याची मागणी केली. या आंदोलनाने आज यवतमाळकरांचे लक्ष वेधून घेतले. शेतकरी नेते देवानंद पवार यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात जाऊन शेतक-यांनी अर्ज सादर केला. या अर्जामध्ये, मी खालील सही करणारा पीकविमा धारक शेतकरी मौजा शिवणी ता. घाटंजी जि. यवतमाळ येथील रहिवाशी असुन याद्वारे आपणास नम्र निवेदन करतो की, या वर्षीच्या खरीप हंगामातील कापुस व सोयाबीन या पिकाकरिता केंद्र व राज्य सरकारच्या मेहरबानीने विमा कंपनीने मला ५२ रुपये ९९ पैसे इतक्या रक्कमेचा भरीव पीकविमा मंजुर केला आहे. यामुळे मी खुप खुप खुश व आनंदीत झालो आहे. सदरची रक्कम माझ्या सारख्या एका गरीब शेतकऱ्यासाठी ५० खोक्यापेक्षाही मोठी असल्याने या रक्कमेच्या सुरक्षेची मला फारच काळजी लागली आहे. शिवाय बँकेतून ही रक्कम पिशवी अथवा सुटकेस मधुन नेणे मला शक्य नसल्याने रक्कम नेण्यासाठी मी वडिलोपार्जित तिजोरी व बैलबंडी



“ जिल्ह्यातील आठ लाख ४४ हजार शेतकऱ्यांनी ५०९ कोटींचा विमा हप्ता भरला होता. यावर्षी अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यापोटी विमा कंपनीने शेतकऱ्यांना तीन हजार १७७ कोटी रूपये नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे. प्रत्यक्षात ५९ हजार शेतकऱ्यांना ४१ कोटी १० लाख रूपयेच दिले. जवळपास आठ लाख शेतकरी विम्याच्या नुकसान भरपाईपासून वंचीत आहे. दुसरीकडे ज्यांना भरपाई मिळाली त्यात अनेकांना पाच पन्नास रुपये देऊन त्यांची थट्टा करण्यात आली. सरकारने शेतक-यांना एक रुपयात पीक विमा दिला कि भीक हे आता स्पष्ट करावे.

**– देवानंद पवार,** शेतकरी नेते, यवतमाळ

आणली आहे. रुपये ५२.९९ इतक्या मोठ्या रक्कमेने भरलेली तिजोरी बैलगाडीवरून नेतांना रस्त्यात लुटमार होण्याची किंवा दरोडा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

साऱ्या जगाची व चोरट्यांची नजर माझ्या पीकविम्याच्या रुपये ५२.९९ कडे लागली आहे. माझ्यासाठी ही रक्कम अतिशय महत्त्वाची आहे. सीबील च्या अटीमुळे बँकेचे पीककर्ज न मिळाल्याने सावकाराकडून दिडीतिडीने घेतलेले कर्ज पिकविम्याच्या या पैश्यातून सर्वप्रथम फेडीन. उभ्या पिकांची नासाडी करणाऱ्या जंगली प्राण्यांचा व डुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी शेताला तारेचे कुंपण करीन. तब्येत बरी नसतांनाही शेतात रात्रंदिवस काबाडकष्ट करणाऱ्या माझ्या बायकोला दवाखान्यात नेईन. गेल्या अनेक महिन्यांपासून फाटक्या पॅंटेत शाळेत जाणाऱ्या पोराला कपडे घेईन. वयात आलेल्या मुलीचे धुमधडाक्यात लग्न करीन. अन् पूर्ण कुटुंबासह एकदा गुवाहाटीला पर्यटनासाठी जाऊन येईल आणि संकटग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या आयुष्यात भरभराटी निर्माण करणाऱ्या देशी - विदेशी महागड्या गाड्यांच्या प्रदर्शनासाठी पालकमंत्री ना. संजय राठोड यांना भरीव आर्थिक देणगी देईन व उरलीसुरली रक्कम तिजोरी सांभाळून ठेवीन. म्हणून पीकविम्याची ही मदत माझ्या व माझ्या कुटुंबासाठी खुपचं महत्वाची आहे. मात्र, एवढी मोठी रक्कम घरी नेतांना रस्त्यात लुटमारीची प्रचंड भिती वाटत असल्याने आपण मला पीकविमा रक्कमेच्या सुरक्षेसाठी किमान सहा सशस्त्र पोलीस पुरवावे, अशी मागणी शेतक-याने पोलिस अधिक्षक यांच्याकडे केली आहे. शेतक-यांनी या मागणीच्या माध्यमातून सरकारला फटकारले असून आपला संताप व्यक्त केला आहे. आज गुरुवारी दुपारी शेतकऱ्यांनी वाजत गाजत लोखंडी तिजोरी नेऊन पोलिस अधिक्षकांना संरक्षणासाठी अर्ज सादर केले. या मोर्चात देवानंद पवार, शैलेष इंगोले, अशोक भुतडा, प्रा. विठ्ठल आडे, संजय डंभारे, उमेश इंगळे, बंडु जाधव, घनशाम अत्रे, संगीत काळे, रामधन राठोड, रामचंद्र राठोड, वासुदेव राठोड, रणजीत जाधव, अमोल बेले, प्रदीप डंभारे, अरुण ठाकुर, लालसिंग अजमेरकर, कुणाल जतकर यांच्यासह मोठ्या संख्येत शेतकरी सहभागी झाले होते.

# हल्ला फक्त मलिक यांच्यावर; बाकीचे यांच्या मांडीवर!

## » शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊतांनी भाजपला डिवचलं

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADNAVIS) यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार नवाब मलिक (NAWAB MALIK) यांचा महायुतीतील समावेशाला विरोध केल्यानंतर आता विरोधकांनाही महायुतीला लक्ष्य करण्याची आयती संधी मिळाली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत (SANJAY RAUT) यांनी भाजपला डिवचलं आहे.**

हल्ला फक्त मलिक यांच्यावर बाकीचे यांच्या मांडीवर अशा शब्दात हल्लाबोल करत राऊतांनी भाजपवर टीकास्त्र सोडले आहे. सध्या जामिनावर असलेले राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार नवाब मलिक यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात हजेरी लावली. राष्ट्रवादीतील फुटीनंतर मलिक यांनी आपली भूमिका स्पष्ट केली नव्हती. मात्र, आज मलिक हे थेट सत्ताधारी बाकांवर बसल्याने विरोधकांनी भाजपला घेरण्याचा प्रयत्न केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली भाजपची भूमिका विधान परिषदेत मांडली. मात्र, त्याच वेळेस सायंकाळी फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांना पत्र लिहून मलिकांच्या





महायुतीतील समावेशला विरोध केला. फडणवीस यांच्या पत्रानंतर विरोधकांनी भाजपवर निशाणा साधला. शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी या पत्रावरून भाजपवर बोचरा वार केला. अरे बापरे! सत्तेपेक्षा देश महत्वाचा अशी एकदम नवी माहिती देवेंद्रजी यांनी दिली असल्याचा उपरोधिक टोला राऊत यांनी लगावला. राऊतांनी पुढे म्हटले की, त्यांच्या देशात हसन मुश्रीफ, प्रफुल पटेल,सिंचन घोटाळा फेम अजित पवार, ED फेम भावना गवळी,सरनाईक, मुलुंडचे पोपटलाल यांना मानाचे स्थान आहे. यांचा देश हा असा आहे! हल्ला फक्त मलिक यांच्यावर.बाकीचे यांच्या मांडीवर! अशी टीका करताना पिते दूध डोळे मिटूनी..जात मांजराची.. असा टोला लगावला आहे. नवाब मलिक यांच्या अजितदादा गटाच्या सोबत येण्यावरून देवेंद्रजींनी एक पत्र दादांना लिहिल्याचे समजते, सगळ्यात गमतीदार भाग आहे, दिवसभरातल्या एकूण घडामोडी पाहता, ज्या पद्धतीने देवेंद्रजी ट्रोल झालेले आहेत आणि महाराष्ट्राला ते पचन झालेलं नाही.

### संजय राऊत यांचा बोचरा वार

» शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी या पत्रावरून भाजपवर बोचरा वार केला. अरे बापरे! सत्तेपेक्षा देश महत्वाचा अशी एकदम नवी माहिती देवेंद्रजी यांनी दिली असल्याचा उपरोधिक टोला राऊत यांनी लगावला. राऊतांनी पुढे म्हटले की, त्यांच्या देशात हसन मुश्रीफ, प्रफुल पटेल,सिंचन घोटाळा फेम अजित पवार, ED फेम भावना गवळी,सरनाईक, मुलुंडचे पोपटलाल यांना मानाचे स्थान आहे. यांचा देश हा असा आहे! हल्ला फक्त मलिक यांच्यावर.बाकीचे यांच्या मांडीवर! अशी टीका करताना पिते दूध डोळे मिटूनी..जात मांजराची.. असा टोला लगावला आहे.

# नेहरूंनी चूक केली असं मानूया!

## » अमित शाह यांचे पाकव्याप्त काश्मीरबाबत मोठं वक्तव्य

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसवर आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका केली. शाह यांनी बुधवारी (६ डिसेंबर) लोकसभेत केलेल्या भाषणात भारत-पाकिस्तान युद्धाचा संदर्भ देत पंडित नेहरूंना लक्ष्य केलं. अमित शाह म्हणाले, नेहरूंनी केलेल्या चुकांमुळे काश्मीरला खूप काही भोगावं लागलंय.**



परंतु, पंजाब जिंकल्यानंतर नेहरूंनी युद्धबंदीची घोषणा केली. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरचा जन्म झाला. नेहरूंनी तीन दिवसांनंतर युद्धबंदी केली असती, तर आज पाकव्याप्त काश्मीर भारताचा भाग असता. त्यानंतर नेहरूंनी आणखी एक चूक केली. त्यांनी भारत-पाकिस्तान वादाचा मुद्दा संयुक्त राष्ट्रात नेला.

अधीर रंजन चौधरी म्हणाले, पाकव्याप्त काश्मीरबाबत संसदेत एक अख्खा दिवस चर्चा व्हायला हवी. कारण हा काही छोटा वाद नाही. देशातल्या जनतेला या वादाचं गांभीर्य आणि खोली माहिती असायला हवी. त्याचबरोबर गेल्या अनेक वर्षांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह पाकव्याप्त काश्मीर हिसकावून घेण्याच्या घोषणा करत आहेत. अमित शाह जसं म्हणतायत त्याप्रमाणे आपण असं मानूया की, नेहरूंनी चूक केली होती. अमित शाह गेल्या दशकभरापासून तीच तक्रार करत आहेत. २०१९ मध्ये कलम ३७० हटवण्यात आलं तेव्हा लोकसभेत अमित शाह म्हणाले होते, पीओके, सियाचीन हा सर्व काश्मीरचा भाग आहे. तसेच अमित शाह हा भाग परत मिळवण्याचा दावा करत होते. यांच्या सरकारला आता १० वर्ष होत आली आहेत. अटल बिहारी वाजपेयी यांचं सहा वर्षे सरकार होतं. या १६ वर्षांमध्ये पाकव्याप्त काश्मीर घेण्यापासून तुम्हाला कोणी अडवलं होतं? या देशात दोन पराक्रमी नेते आहेत. एक मोदी आणि दुसरे शाह, या दोघांना पाकव्याप्त काश्मीर घेण्यापासून कोणी रोखलंय? काँग्रेस खासदार अधीर रंजन चौधरी म्हणाले, पाकव्याप्त काश्मीरचं राहूद्या, किमान तिथून एक सफरचंद तरी आणून दाखवा. पाकव्याप्त काश्मीरमधून चीन-पाकिस्तान इकोनॉमिक कॉरिडोर बनवला जातोय. यावर मोदी आणि शाह का गप्प बसले आहेत? तुम्ही जी-७, जी-२०, शांघाय परिषदांना जाता, मग तिथे जाऊन पीओकेसाठी प्रयत्न का करत नाही. पाकव्याप्त काश्मीर घेऊन दाखवा. काँग्रेसला जमलं नाही ते काम तुम्ही करून दाखवा, एखादं सफरचंद आणून दाखवा. तेवढं केलं तरी तो तुमचा मोठा पराक्रमक असेल. लडाखमध्ये अतिक्रमण झालंय. गलवान खोऱ्यातल्या घटना सर्वांना माहिती आहेत. अधीर रंजन चौधरी म्हणाले, पाकव्याप्त काश्मीरबाबत संसदेत एक अख्खा दिवस चर्चा व्हायला हवी. कारण हा काही छोटा वाद नाही. देशातल्या जनतेला या वादाचं गांभीर्य आणि खोली माहिती असायला हवी. त्याचबरोबर गेल्या अनेक वर्षांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह पाकव्याप्त काश्मीर हिसकावून घेण्याच्या घोषणा करत आहेत. अमित शाह जसं म्हणतायत त्याप्रमाणे आपण असं मानूया की, नेहरूंनी चूक केली होती. अमित शाह गेल्या दशकभरापासून तीच तक्रार करत आहेत. २०१९ मध्ये कलम ३७० हटवण्यात आलं तेव्हा लोकसभेत अमित शाह म्हणाले होते, पीओके, सियाचीन हा सर्व काश्मीरचा भाग आहे. तसेच अमित शाह हा भाग परत मिळवण्याचा दावा करत होते. यांच्या सरकारला आता १० वर्ष होत आली आहेत. या १६ वर्षांमध्ये पाकव्याप्त काश्मीर घेण्यापासून तुम्हाला कोणी अडवलं होतं? या देशात दोन पराक्रमी नेते आहेत. एक मोदी आणि दुसरे शाह, या दोघांना पाकव्याप्त काश्मीर घेण्यापासून कोणी रोखलंय?केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसवर आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका केली.

### काश्मीर भारताचा भाग असता

» केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसवर आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका केली. शाह यांनी बुधवारी (६ डिसेंबर) लोकसभेत केलेल्या भाषणात भारत-पाकिस्तान युद्धाचा संदर्भ देत पंडित नेहरूंना लक्ष्य केलं. अमित शाह म्हणाले, नेहरूंनी केलेल्या चुकांमुळे काश्मीरला खूप काही भोगावं लागलंय. भारत-पाकिस्तान युद्धात आपलं सैन्य जिंकत होतं. परंतु, पंजाब जिंकल्यानंतर नेहरूंनी युद्धबंदीची घोषणा केली. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरचा जन्म झाला. नेहरूंनी तीन दिवसांनंतर युद्धबंदी केली असती, तर आज पाकव्याप्त काश्मीर भारताचा भाग असता. त्यानंतर नेहरूंनी आणखी एक चूक केली. त्यांनी भारत-पाकिस्तान वादाचा मुद्दा संयुक्त राष्ट्रात नेला.

# सावरकर वीर नव्हते : प्रियांक खरगे

## » काँग्रेस नेत्याच्या वक्तव्यामुळे नवा वाद

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**सावरकर हे काही वीर नव्हते. जर मी प्रभारी असतो तर सुवर्ण विधानसभेत लावण्यात आलेला त्यांचा फोटो काढून टाकला असता. असं वक्तव्य कर्नाटकातील काँग्रेसचे नेते आणि मंत्री प्रियांक खरगे यांनी केलं आहे. प्रियांक खरगे यांच्या या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. खरगे यांच्या वक्तव्यावर भाजपाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**



"सावरकरांचे योगदान काय? या विषयावर काँग्रेस कार्यालयातील पत्रकार परिषदेत मी दीड तास बोललो. सावरकरांना वीर ही पदवी कशी मिळाली हे भाजपाने सांगितलं पाहिजे. तसंच वीर ही पदवी सावरकरांना कुणी दिली? सावरकर इंग्रजांकडून पेन्शन घेत नव्हते हे भाजपा सांगेल का? मी आज माझं मत मांडतो आहे. माझ्या हाती असतं तर विधानसभेतून सावरकरांचा फोटो काढून टाकला असता. सावरकर अजिबात वीर नव्हते याबाबत मी आव्हान द्यायलाही तयार आहे." असं प्रियांक खरगे यांनी म्हटलं आहे. काँग्रेस नेते बी के हरीप्रसाद यांनीही प्रियांक खरगे योग्य भूमिका मांडली आहे असं म्हटलं आहे. सावरकरांचे स्वातंत्र्य लढ्यातलं योगदान शून्य आहे असंही ते म्हणाले. भाजपाची सत्ता आल्याने कर्नाटक विधानसभेत सावरकर यांचं चित्र लावण्यात आलं. भाजपाला इतिहास बदलायचा आहे. असा आरोप बी. के. हरीप्रसाद यांनी केला. कर्नाटक विधानसभेतून जर वीर सावरकर यांचं चित्र हटवण्यात आलं तर तीव्र निषेध नोंदवला जाईल असा इशारा भाजपा आमदार भरत शेट्टींनी दिला आहे. प्रियांक खरगे यांच्याकडे चुकीची माहिती आहे. मात्र त्यांना वाटते की ते सुशिक्षित लोकांपैकी आहेत. वीर सावरकरांचे चित्र काढण्याचा प्रयत्न केल्यास सभागृह आणि सभागृहाच्या बाहेर तीव्र विरोध केला जाईल असा इशाराच भाजपाने दिला आहे. सावरकर हे काही वीर नव्हते. जर मी प्रभारी असतो तर सुवर्ण विधानसभेत लावण्यात आलेला त्यांचा फोटो काढून टाकला असता.

# लोकसभेत अमित शाहांना आव्हान!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

संसदीय अधिवेशनादरम्यान, लोकसभेत बोलत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पाकव्याप्त काश्मीरबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. पाकव्याप्त काश्मीरमधून विस्थापित झालेल्यांच्या कुटुंबांना प्रतिनिधित्व देण्यासाठी जम्मू-काश्मीर विधानसभेत एक जागा राखीव ठेवण्यात आली आहे.

तसेच या तीनपैकी एका जागेवर महिला असणे आवश्यक आहे. याबद्दलची माहिती देताना अमित शाह लोकसभेत म्हणाले, पाकव्याप्त काश्मीर आमचंच आहे. पाकव्याप्त काश्मीरसाठी भारताने जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत २४ जागा राखीव ठेवल्या आहेत. लोकसभेत "जम्मू-काश्मीर पुनर्गठन विधेयक" आणि "जम्मू-काश्मीर आरक्षण (सुधारणा) विधेयक" या दोन विधेयकांवर चर्चा झाल्यानंतर अमित शाह यांनी ही घोषणा केली. तसेच पाकव्याप्त काश्मीरबाबत बोलत असताना अमित शाह यांनी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका केली. पंडित नेहरू यांच्याकडून झालेल्या दोन चुकांमुळे काश्मीरला पुढची अनेक वर्षे खूप काही भोगावं लागलं आहे, असा दावा अमित शाह यांनी आपल्या भाषणात केला.

# 'हाय नन्ना' जिंकतोय प्रेक्षकांची मनं!

साऊथ चित्रपटासृष्टीमधील स्टार नानी (NANI) आणि अभिनेत्री मृणाल ठाकूर (MRUNAL THAKUR) यांचा 'हाय नन्ना' (HI NANNA) हा चित्रपट आज (7 डिसेंबर) थिएटरमध्ये रिलीज झाला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळत असून अनेकांनी या चित्रपटाचा फर्स्ट डे फर्स्ट शो पाहिला आहे. 'हाय नन्ना' या चित्रपटाची कथा आणि या चित्रपटामधील नानी आणि मृणालच्या ऑनस्क्रीन केमिस्ट्रीला प्रेक्षकांची पसंती मिळत आहे. हा चित्रपट पाहिल्यानंतर अनेकांनी ट्विटरवर या चित्रपटाचा रिव्ह्यू शेअर केला आहे. एका नेटकऱ्यानं हाय नन्ना या चित्रपटाला चार स्टार दिले आहेत. त्यानं ट्विटरवर शेअर केलेल्या रिव्ह्यूमध्ये लिहिलं, "हा कौटुंबिक प्रेमकथा असलेला अतिशय सुरेख चित्रपट आहे. वीकेंडला तुमचे कुटुंब हा चित्रपट पाहू शकते. ही एक हृदयस्पर्शी कथा आहे. चित्रपटाचा पहिल्या हाफ चांगला आहे, तसेच चित्रपटाचा दुसरा हाफ आणि क्लायमॅक्स देखील छान, नानीनं नेहमीप्रमाणे चांगले काम केलं आहे. मृणालनं देखील प्रेक्षकांचे मन जिंकले आहे." हा मास्टरपीस मनाच्या खोलवर रुजतो. चित्रपटातील संगीत उत्तम आहे, आणि चित्रित केलेल्या भावना खोलवर हलवल्या आहेत, मला हा चित्रपट वीकेंडला पुन्हा बघायला आवडेल.", असंही एका नेटकऱ्यानं ट्वीटमध्ये लिहिलं आहे. 'हाय नन्ना' या चित्रपटात वडील आणि त्याच्या सहा वर्षांच्या मुलीची कथा दाखवण्यात आली आहे. जेव्हा अभिनेता लग्न करते तेव्हा त्यांचे आयुष्य बदलते. या चित्रपटात नानी, मृणाल ठाकूर आणि श्रुती हासन यांच्या प्रमुख भूमिका आहेत. शौर्य यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे.

# ऑपरेशन वॅलेंटाईन'ची रिलीज डेट टळली

वरुण तेज आणि मानुषी छिल्लर स्टारर ऑपरेशन व्हॅलेंटाईन ८ डिसेंबर, २०२३ रोजी चित्रपटगृहात रिलीज होणार होती. आता निर्मात्यांनी एक अधिकृत स्टेटमेंट जारी करून खुलासा केला आहे की, चित्रपट तारीख पुढे ढकलली जात आहे. (OPERATION VALENTINE FILM ) निर्मात्यांनी म्हटले आहे की, “वरुण तेज आणि मानुषी छिल्लरचा चित्रपट ‘ऑपरेशन व्हॅलेंटाईन’ प्रेक्षकांसाठी उत्तम चित्रण दाखवण्यासाठी एक नवी रिलीज डेट असेल. सोबत राहा. ऑपरेशन व्हॅलेंटाईन सोनी पिक्चर्स इंटरनॅशनल प्रोडक्शन्स, संदीप मुड्डाची रेनेसां पिक्चर्स द्वारा निर्मित आणि गॉड ब्लेस एंटरटेनमेंट (वकील खान), नंदकुमार अब्बिनेनी द्वारा सह-निर्मित आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून शक्ती प्रताप सिंह हाडा दिग्दर्शन क्षेत्रात डेब्यू करत आहेत. शक्ति प्रताप सिंह हाडा, आमिर खान आणि सिद्धार्थ राज कुमार द्वारा लिखित, ऑपरेशन व्हॅलेंटाईन तेलुगु आणि हिंदीमध्ये रिलीज होईल. नव्या रिलीज डेटची घोषणा अद्याप समोर आलेली नाही.

# रणबीर रश्मिकाला म्हणतो



णबीर कपूरच्या ॲनिमलमनं एव्हाना सगळीकडे वेगवेगळ्या चर्चेला सुरुवात करुन दिली आहे. हा चित्रपट भलेही बॉक्स ऑफिसवर सुपरहिट झाला असेल मात्र आता त्यावरुन वेगवेगळ्या वादाला सुरुवात झाली आहे. खासकरुन महिला वर्गानं त्याबाबत नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले आहे. त्या चित्रपटामध्ये एक सीन आहे. ज्यात रणबीर कपूर हा रश्मिकाला म्हणतो की, महिन्यातून चारवेळा पॅड चेंज करताना किती नाटक करतेस तू. मी रोज ५० वेळा ते करतो आहे. त्या संवादावरुन सोशल मीडियावर मोठ्या वादाला सुरुवात झाली आहे. एकानं म्हटलं आहे की, त्या डायलॉगमधून उगाचच पीरियडसचा उल्लेख करण्याची गरज नव्हती. तसे केल्यानं दिग्दर्शक आणि कलाकार यांनी महिलांची नाराजी ओढावून घेतली आहे. त्यांच्यावर टीका होत आहे. जर तुम्हालाच काही माहिती नाही तर असे संवाद चित्रपटात घेताच कशाला, असेही काहींनी म्हटले आहे. महिलेला प्रत्येक महिन्याला तो त्रास होतो. पण त्यामुळे तिचा काही मृत्यू होत नाही. पण त्या चित्रपटातून काहीही सांगून दिशाभूल करण्याचा आणि वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याच्या प्रतिक्रियांना उधाण आले आहे.काहींनी दिग्दर्शक रेड्डी आणि अभिनेता रणबीर कपूर यांच्यावर तीव्र शब्दांत आगपाखड केली आहे. एका युझर्सनं म्हटलं आहे की, ॲनिमलच्या लेखकाला कुणी सांगा की महिन्यात नव्हे तर दिवसभरातून चारवेळा पॅड बदलले जातात. दुसऱ्यानं लिहिलं आहे की, देवा हा किती मोठा अपमान आहे. लोकांना नेमकं काय आवडतं हेच आता कळेनासे झाले आहे, वांगानं डायपरला पॅड असे म्हटले आहे. त्यानं काय केलं आहे हेच त्याला माहिती नाही.

# आता खुर्ची आपलीच हाय'!

मराठी मनोरंजन विश्वामध्ये सध्या एका चित्रपटाची मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. गेल्या काही दिवसांपासून खुर्ची या आगळ्या वेगळ्या विषयावरील चित्रपटानं प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. "जिथे माझ्या कहाणीचा शेवट झाला तिथूनच एका नवीन कहाणीला सुरुवात करण्यासाठी मी राजवीर देसाई पुन्हा आलोय, सत्तेसाठी, खुर्चीसाठी आणि माझ्या अंगात सळसळणाऱ्या रक्तासाठी" या दमदार संवादाने सुरु होणाऱ्या टीझरने प्रेक्षकांना प्रतिक्रिया देण्यास भाग पाडले आहे. १२ जानेवारी २०२४ला 'खुर्ची' या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर वेगळं वादळ घोंगावताना दिसणार आहे. सत्ता, खुर्ची, खून, मारामाऱ्या आणि रक्त या सगळ्याच्या अवतीभोवती फिरणार कथानक प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. टीझरमध्ये पाहायला मिळाल्याप्रमाणे नेमकं सत्तेच्या खुर्चीवर कोण बाजी मारणार हे चित्रपटगृहातच कळेल. या चित्रपटात राकेश बापट, अक्षय वाघमारे,आर्यन हगवणे, सुरेश विश्वकर्मा, महेश घाग, अभिनेत्री प्रीतम कागणे, कल्याणी नंदकिशोर, श्रेया पासलकर या कलाकारांच्या मुख्य भूमिका आहेत. टीझरमध्ये राकेश बापट, अक्षय वाघमारे, व बालकलाकार आर्यन हगवणे या कलाकारांनी त्यांच्या अभिनयाने राडाच घातला आहे. अभिनेता राकेश बापट चित्रपटाबाबत बोलताना, "नुकताच चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला आहे. टिझर पाहून तुम्हाला कल्पना आली असेल की नक्की आम्ही काय व कशा प्रकारचा राडा घातला आहे. एकूणच चित्रपट करताना खूप मज्जा आली" असं तो म्हणाला. तर अभिनेता अक्षय वाघमारे चित्रपटाबाबत बोलताना, "चित्रपट प्रदर्शनापूर्वीच चित्रपटाची झालेली हवा पाहून मी अचंबित झालो आहे.

# ॲनिमल' मधील तृप्ती डिमरीनं सोडलं मौन



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूरचा (RANBIR KAPOOR) ॲनिमल (ANIMAL) हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाचं अनेक जण कौतुक करत आहेत. पण या चित्रपटामधील काही डायलॉग्सला नेटकऱ्यांनी ट्रोल केलं आहे. ॲनिमल चित्रपटामधील रणबीरच्या 'लीक माय शू' या डायलॉगनं देखील अनेकांचे लक्ष वेधले. अशतच आता या डायलॉगवर 'ॲनिमल' चित्रपटामधील अभिनेत्री तृप्ती डिमरीनं (TRIPTI DIMRI) मौन सोडलं आहे. ॲनिमल चित्रपटाच्या एका सीनमध्ये दाखवण्यात आलं आहे की, रणबीर कपूरचे पात्र तृप्तीला तिचे त्याच्यावरील प्रेम सिद्ध करण्यासाठी त्याचे बूट चाटण्यास सांगते. तो तिला 'लीक माय शू' असं म्हणतो. ॲनिमल चित्रपटातील अनेक सीनपैकी हा एक सीन आहे, ज्याच्यावर सोशल मीडियावर अनेकांनी टीका केली. याबाबत एका मुलाखतीमध्ये तृप्तीनं सांगितलं आहे. ॲनिमलमधील सीनबाबत तृप्ती म्हणाली, "माझ्या अभिनय प्रशिक्षकाने मला एक गोल्डन रुल सांगितला होता. ते म्हणाले होते की, कधीही तुमच्या व्यक्तिरेखेला जज करू नका. तुम्ही जी व्यक्तिरेखा साकारत आहात किंवा तुमचा सह-अभिनेता जी व्यक्तिरेखा साकारत आहे, त्याला जज करुन नका, ती एक व्यक्ती असते आणि प्रत्येक व्यक्तीच्या चांगल्या आणि वाईट बाजू असतात. एखाद्या अभिनेत्याने चांगले, वाईट अशा विविध भूमिका साकारण्यासाठी तयार असणे आवश्यक आहे. परंतु जर आपण एखाद्या पात्राच्या प्रेरणा, विचारांना जज केलं तर आपण ते प्रामाणिकपणे साकारू शकणार नाही. म्हणून मी तेच लक्षात ठेवल." 'लीक माय शू' या डायलॉगबाबत तृप्ती म्हणाली, “खऱ्या आयुष्यात जर कोणी मला असे सांगितले तर मी कदाचित त्या व्यक्तीला मारेन! पण चित्रपटात तो तिला तसे करण्यास सांगतो. (त्याचे बूट चाटायला सांगतो) पण नंतर तसं सांगून तो निघून जातो. त्याच्या डोक्यात वेगवेगळे विचार सुरु असतात. माझं पुढे काय करायचं? असा प्रश्न जेव्हा त्याचे चुलत भाऊ विचारतात तेव्हा तो त्यांना म्हणतो,'तिला जिथे पाहिजे तिथे जाऊ द्या.'बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता रणबीर कपूरचा (RANBIR KAPOOR) ॲनिमल (ANIMAL) हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाचं अनेक जण कौतुक करत आहेत. पण या चित्रपटामधील काही डायलॉग्सला नेटकऱ्यांनी ट्रोल केलं आहे. ॲनिमल चित्रपटामधील रणबीरच्या 'लीक माय शू' या डायलॉगनं देखील अनेकांचे लक्ष वेधले.

# श्रीसंत आणि गंभीर यांच्यात शाब्दिक वाद

## » सोशल मीडियावर दोन्ही जण एकमेकांविरुद्ध लिहित आहेत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारताचे दोन माजी क्रिकेटपटू श्रीसंत आणि गौतम गंभीर यांच्यातील वाद थांबायचे नाव काही घेत नाहीये. सोशल मीडियावर दोन्ही जण एकमेकांविरुद्ध लिहित आहेत. श्रीसंतच्या विधानावर गंभीरची गूढ पोस्ट समोर येते, त्याला प्रत्युतर म्हणून श्रीसंतने आणखी एक व्हिडीओ पोस्ट केला आहे आणि थेट सामन्यादरम्यान गंभीरने मैदानाच्या मध्यभागी काय म्हटले होते ते सांगितले, ज्यामुळे प्रकरण आणखीनच चिघळले होते. श्रीसंतच्या म्हणण्यानुसार, “गंभीरने त्याला ‘तू फिक्सर है...तू फिक्सर है’ म्हणत अपशब्द बोलला.” श्रीसंत म्हणाला की, “मी गंभीरला काहीही बोललो नाही आणि फक्त तो का रागावला आहे असे विचारत होता.**

श्रीसंत म्हणाला, “गुजरात जायंट्स आणि इंडिया कॅपिटल्स यांच्यातील लिजेंड्स लीग क्रिकेट सामन्यादरम्यान गौतम गंभीर मला जे काही अपशब्द बोलला ते मी उघडपणे सांगितले आहे.” श्रीसंतने आपल्या नवीन व्हिडीओमध्ये म्हटले आहे की, “अनेक चॅनल मला कॉल करत आहेत आणि माझ्याकडून मैदानावर काय घडले ते जाणून घ्यायचे आहे. मी अशा प्रकारची व्यक्ती नाही जी पीआर (जनसंपर्क) मध्ये खूप पैसे खर्च करते आणि चुकीच्या गोष्टी पसरवते. म्हणूनच मी थेट येत आहे आणि तुमच्याशी बोलत आहे. मला प्रत्येक वृत्तवाहिनीवर त्याच गोष्टीची पुनरावृत्ती करायची नाही. श्रीसंत पुढे म्हणाला, “आम्हाला माहित आहे की तो (गंभीर) किती शक्तिशाली आहे आणि तो पीआरवर किती खर्च करू शकतो. मी एक सामान्य माणूस आहे, ज्याने माझ्या कुटुंबासाठी आणि इतर सर्व गोष्टींसाठी एकट्याने लढा दिला आहे. त्यामध्ये तुम्हा सर्वांचेही सहकार्य लाभले आहे. जगासमोर लाइव्ह टीव्हीवर तो मला फिक्सर



फिक्सर म्हणत राहिला. मी त्याला एकही वाईट शब्द बोललो नाही. मी त्याला कोणताही आक्षेपार्ह शब्द वापरला नाही. मी फक्त त्याला विचारले, ‘तू मला काय सांगत आहेस?’ हे मी हसत विचारात होतो कारण, तो मला पुन्हा पुन्हा फिक्सर म्हणत होता. त्यामुळे माझा संयम देखील सुटला आणि मी त्याच्यावर चिडलो आणि म्हणालो, ‘तू फायटर आहेस.’ मात्र, त्यावेळी देखील त्याला वाईट शब्द बोललो नाही. श्रीसंत अंपायरबाबत म्हणाला, “अंपायर गौतमला समजवून सांगण्याचा प्रयत्न करत असतानाही तो असेच शब्द वापरत होता. कदाचित त्यांचा पीआर खूप मजबूत असेल, पण मी प्रत्येक चॅनलवर येऊन तेच सांगू शकत नाही. म्हणूनच मी थेट आलो आहे आणि तुम्हाला संपूर्ण सत्य सांगितले आहे. सोशल मीडियावर जर माझ्याविरोधातील कोणताही व्हिडीओ व्हायरल होत असेल, तर त्याची प्रतिमा जपण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, हे समजावे. मी माझ्या बाजूने एकही शब्द किंवा शिवीगाळ केली नाही. तो पुढे म्हणाला, “गंभीर फक्त माझ्याबरोबरच असे करत नाही तर, अनेक लोकांबाबतीत असे वागतो. त्यांनी हे का सुरू केले, ते मला माहित नाही. विकेट पडल्यावर ब्रेकच्या वेळीही तो माझ्याशी काही शब्द बोलत राहिला. सिक्सर-सिक्सरने काहीतरी बोलल्याचा संदेश सोशल मीडियावर लोकांनी पसरवला, पण तो तसा बोलला नाही. गंभीर म्हणाला, ‘तू फिक्सर आहेस.’ हे बोलला. ते बोलण्याचा त्याला अधिकार नाही. मला हवे असल्यास मी त्याच्यावर पुढील कायदेशीर कारवाई करू शकतो. मात्र, मला हे प्रकरण संपवायचे आहे, परंतु त्याचे लोक त्याचे प्रतिमा जपण्यासाठी मला टार्गेट करत आहेत. याआधी गंभीरने सोशल मीडियावर एक पोस्ट केली होती. या पोस्टमध्ये त्याने कोणाचेही नाव घेतले नसून, हे श्रीसंतला दिलेले उत्तर मानले जात आहे. गंभीरने गुरुवारी सकाळी ११:३० वाजता ट्वीटरवर एक पोस्ट टाकली, ज्यामध्ये तो टीम इंडियाच्या जर्सीत आहे आणि हसत आहे. गंभीर भारतीय संघात खेळत असतानाचे हे चित्र आहे. त्याने त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिले, “स्माईल! जेव्हा जगातील लोक फक्त लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत असतात तेव्हा दुर्लक्ष करायचे असते.

### मी एक सामान्य माणूस आहे

» मी एक सामान्य माणूस आहे, ज्याने माझ्या कुटुंबासाठी आणि इतर सर्व गोष्टींसाठी एकट्याने लढा दिला आहे. त्यामध्ये तुम्हा सर्वांचेही सहकार्य लाभले आहे. जगासमोर लाइव्ह टीव्हीवर तो मला फिक्सर फिक्सर म्हणत राहिला. मी त्याला कोणताही आक्षेपार्ह शब्द वापरला नाही. मी फक्त त्याला विचारले, ‘तू मला काय सांगत आहेस?’ हे मी हसत विचारात होतो कारण, तो मला पुन्हा पुन्हा फिक्सर म्हणत होता. त्यामुळे माझा संयम देखील सुटला आणि मी त्याच्यावर चिडलो आणि म्हणालो, ‘तू फायटर आहेस.’ मात्र, त्यावेळी देखील त्याला वाईट शब्द बोललो नाही. श्रीसंत अंपायरबाबत म्हणाला, “अंपायर गौतमला समजवून सांगण्याचा प्रयत्न करत असतानाही तो असेच शब्द वापरत होता.

# आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ कोण असेल?

## » शमीला ऑस्ट्रेलियाच्या ‘या’ दोन दिग्गज खेळाडूंचे आव्हान

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीची कामगिरी उत्कृष्ट राहिली होती. तो या स्पर्धेत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज होता. शमीच्या या शानदार कामगिरीनंतर त्याला नोव्हेंबर महिन्याच्या आयसीसी प्लेयर ऑफ द मंथ पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. तथापि, शमीसाठी हा पुरस्कार जिंकणे सोपे होणार नाही. कारण त्याला एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे विजेतेपद पटकावणाऱ्या कांगारू संघाच्या दोन खेळाडूंकडून कठीण आव्हान आहे. शमीसह ग्लेन मॅक्सवेल आणि ट्रॅव्हिस हेड यांनाही या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे.**



मोहम्मद शमीने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक २४ बळी घेतले होते, परंतु ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत शमीने नोव्हेंबर महिन्यात एकूण १५ बळी घेतले होते आणि त्याची सरासरी १२.०६ होती, तर इकॉनॉमी रेट ५.६८ होता. तसेच, शमीने या स्पर्धेत केवळ ७ सामन्यात २४ बळी घेतले होते. नोव्हेंबर महिन्यात त्याने श्रीलंकेविरुद्ध ५ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता, तर उपांत्य फेरीत त्याने किवी संघाविरुद्ध ५७ धावांत ७ विकेट्स घेतल्या होत्या. ट्रॅव्हिस हेडबद्दल बोलायचे, तर एकदिवसीय विश्वचषक त्याच्यासाठी खूप चांगला होता आणि नोव्हेंबर महिन्यात त्याने आपल्या संघासाठी ५ सामन्यात २२० धावा केल्या.

उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत त्याने आपल्या संघासाठी उत्कृष्ट इनिंग खेळली. त्याचबरोबर अंतिम सामन्यात भारताविरुद्धची त्याची खेळी संस्मरणीय ठरली, ज्यात त्याने १२० चेंडूत १३७ धावा केल्या. उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने आपल्या संघासाठी ४८ चेंडूत ६२ धावांची महत्त्वपूर्ण इनिंग खेळली होती. ग्लेन मॅक्सवेलने गेल्या महिन्यात कांगारू संघासाठी तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये १५२.२३ च्या स्ट्राइक रेटने २०४ च्या सरासरीने २०४ धावा केल्या, त्यासोबत दोन विकेट्स घेतल्या. यानंतर, भारताविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दोन सामन्यांमध्ये, त्याने २०७.१४ च्या प्रभावी स्ट्राइक रेटने ११६ धावा केल्या.

नोव्हेंबर मध्येच विश्वचषकादरम्यान, मॅक्सवेलने अफगाणिस्तानविरुद्ध १२८ चेंडूत २०१ धावांची नाबाद खेळी खेळली होती. त्याने यादरम्यान २१ चौकार आणि १० षटकार मारले.

### शमीची हेड आणि मॅक्सवेलशी टक्कर

» मोहम्मद शमीने २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत सर्वाधिक २४ बळी घेतले होते, परंतु ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत शमीने नोव्हेंबर महिन्यात एकूण १५ बळी घेतले होते आणि त्याची सरासरी १२.०६ होती, तर इकॉनॉमी रेट ५.६८ होता. तसेच, शमीने या स्पर्धेत केवळ ७ सामन्यात २४ बळी घेतले होते. नोव्हेंबर महिन्यात त्याने श्रीलंकेविरुद्ध ५ विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता, तर उपांत्य फेरीत त्याने किवी संघाविरुद्ध ५७ धावांत ७ विकेट्स घेतल्या होत्या. ट्रॅव्हिस हेडबद्दल बोलायचे, तर एकदिवसीय विश्वचषक त्याच्यासाठी खूप चांगला होता आणि नोव्हेंबर महिन्यात त्याने आपल्या संघासाठी ५ सामन्यात २२० धावा केल्या. उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीत त्याने आपल्या संघासाठी उत्कृष्ट इनिंग खेळली. त्याचबरोबर अंतिम सामन्यात भारताविरुद्धची त्याची खेळी संस्मरणीय ठरली, ज्यात त्याने १२० चेंडूत १३७ धावा केल्या. उपांत्य फेरीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने आपल्या संघासाठी ४८ चेंडूत ६२ धावांची महत्त्वपूर्ण इनिंग खेळली होती.

# MahaENews

The fight for truth... the right to democracy!

www.mahaenews.com | FRIDAY, 8th DECEMBER 2023 | Digital Edition | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# Development works in the city need time-bound planning!

## Suggests BJP City President Shankar Jagtap; Inspection of development works with Municipal Commissioner

**Pimpri : Representative**

**Pimpri-Chinchwad Municipal Corporation is under administrative rule and this calls for the administration to fix a time-bound program to provide infrastructure facilities to the citizens. Development works can be accelerated through such program. BJP city president Shankar Jagtap suggested that projects should be launched from a positive approach in terms of the overall development of the city.**






BJP City President Shankar Jagtap along with Commissioner and Administrator of Pimpri-Chinchwad Municipal Corporation Shekhar Singh inspected various proposed development works in Navi Sangvi area. During which, the development works in Sangvi, Navi Sangvi, Pimple Gurav etc. were reviewed.

Former Mayor Mai Dhore, former standing committee chairman Rajendra Rajapure, former corporator Sagar Angolkar, Harshal Dhore, Usha Munde, Ambernath Kamble, Santosh Kamble, Sharda Sonawane, Shri Ganesh Sahakari Bank director Sanjay Jagtap, former senate member Santosh Dhore, BJP city secretary Hiren Sonawane, social activist Jawahar Dhore along with local citizens were present for this inspection tour.

This time a discussion occurred regarding the bridge in Sangvi leading to Bopodi, Aundh via Sangamnagar, Mamatanagar. Agriculture Department has some technical issues regarding this bridge, which will be sorted out soon. Similarly, issues related to 12-meter road at Madhuban Society Galli No. 1 to 9, 20-meter road at Krishna Chowk in Navi Sangvi and Ramnagar-Yamuna Society, Mayur Nagri neighborhood were also discussed and decided to accelerate the same.

Shankar Jagtap said that, we are pursuing with a positive attitude with the administration so that infrastructure facilities are available to the citizens efficiently. We keep on insisting for highly qualitative facilities should be provided to the citizens. We expect the administration to create basic facilities by considering at least the period of next 50 years.



"Considering increasing urbanization and traffic problems of the city, municipal administration should take up the works of the proposed roads and bridges over the river immediately. Likewise, initiatives should be taken to provide alternative roads for the main roads. From this point of view, there was a positive discussion with Administrative Head Shekhar Singh. The proposed works will definitely be accelerated in near future.

**- Shankar Jagtap,**

Chairman, Shree Ganesh Sahakari Bank Ltd., Pimple Gurav.

# Chief Justice Chandrachud's Visit Highlights Water Crisis In Pune

## Divisional Commissioner Takes Swift Action

**Pune:**

**Chief Justice Dhananjaya Yeshwant Chandrachud is scheduled to attend a Symbiosis Internation (Deemed University) graduation ceremony in Lavale, sparking intensive preparations by the Pune Municipal Corporation (PMC) and Police.**

During an inspection led by Divisional Commissioner Saurabh Rao in Sus, Balewadi, and Lavale, concerns about the severe water situation in Pune became apparent. The Chief Justice's visit has inadvertently brought attention to the critical issue of water scarcity in various parts of the city.

As per VVIP protocol, elaborate preparations are underway for Chief Justice Chandrachud's attendance at the graduation ceremony on Saturday (9th December). The inspection led by Divisional Commissioner Rao found water tankers in the area, prompting a firsthand experience of Pune's water scarcity. Concerned about the situation, Rao directed PMC to submit a detailed report on water distribution and tanker deployment.

Pune has been grappling with a severe water problem, notably affecting large housing societies, apartments, and newly included municipal areas. The lack of substantial action by PMC led to a Public Interest Litigation filed by the Akhil Bhartiya Grahak Panchayat and a housing society federation in the Bombay High Court. In response, the Bombay High Court mandated a committee, chaired by Divisional Commissioner Rao, to address water supply issues in Pune and Pimpri-Chinchwad.

### Water scarcity meeting in Pune

In a meeting held today, Divisional Commissioner Rao expressed his concern about water shortages, highlighting instances he witnessed during municipal tree-felling activities. A subsequent meeting in the first week of January has been scheduled, where PMC officials are instructed to visit



water-deprived affected areas, such as Undri, Wagholi, Sus, Ambegaon, Narhe, Baner, and Pashan. They are to submit detailed reports and presentations outlining solutions to the water crisis.

### Over 50 citizen representatives...

"It was a very useful and important meeting. Divisional Commisioner, PCMC Municipal Commisioner, Chief engineers of water supply department of both corporations, Retired Judge from District legal aid services were present. Key decisions – instead of once in 2 month, the committee will meet every month. Evaluate possibility of taking over all private water tankers and supply water to housing complexes in no profit no loss basis, conduct visits to all locations where there is water scarcity and provide solutions", said Adv Satya Muley, who represents the citizens and NGOs in the PIL. Over 50 citizen representatives from all over PMC, PCMC were present for the meeting.